स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## जनवादी साहित्यिक

# अण्णा भाऊ साठे

संपादक

डॉ. पी. विठ्ठल     डॉ. राजेश्वर दुडूकनाळे

डायमंड पब्लिकेशन्स

जनवादी साहित्यिक : अण्णा भाऊ साठे

संपादक : डॉ. पी. विठ्ठल, डॉ. राजेश्वर दुडूकनाळे

Janwadi Sahityik : Anna Bhau Sathe

Sampadak : Dr. P. Vitthal, Dr. Rajeshwar Duduknale

■

प्रथम आवृत्ती : १ ऑगस्ट, २०१७

■

ISBN 978-93-86401-11-3

■

© मा. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड-४३१ ६०६.

■

मुखपृष्ठ : शाम भालेकर

■

अक्षरजुळणी : डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

■

गुरुराज प्रिंटर्स, पुणे

■

प्रकाशक

डायमंड पब्लिकेशन्स

२६४/३ शनिवार पेठ, ३०२ अनुग्रह अपार्टमेंट

ओंकारेश्वर मंदिराजवळ, पुणे-४११ ०३०

☎ ०२०-२४४५२३८७, २४४६६६४२

info@diamondbookspune.com

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी भेट द्या

www.diamondbookspune.com

■

मूल्य : २५०/-

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी-फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या आणि लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

Scanned by CamScanner

# अनुक्रम


• भूमिका ९

• संपादकीय ११

१ अण्णा भाऊंचे चरित्र म्हणजे ज्वालामुखी आणि जलाशय यांचा समन्वय १७
डॉ. आ. ह. साळुंखे

२ साहित्यिक अण्णा भाऊ साठे ३३
डॉ. जनार्दन वाघमारे

३ अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य : पुनर्मूल्यांकनाच्या दिशा ४२
डॉ. रणधीर शिंदे

४ अण्णा भाऊ साठे यांची लोकनाट्ये ५६
डॉ. संदीप अ. बनसोडे

५ कादंबरीकार अण्णा भाऊ साठे ६६
डॉ. प्रमोद भीमराव गारोडे

६ अण्णा भाऊ साठे : भारतीय सांस्कृतिक क्रांतीचे ऊर्जास्रोत ८१
डॉ. दिलीप चव्हाण

७ जात, वर्गकलह आणि अण्णा भाऊ ९४
आरती गायकवाड

८ संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार अण्णा भाऊ साठे १०१
डॉ. मारोती द. कसाब

९ अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील सामाजिक तत्त्वज्ञान ११३
डॉ. विठ्ठल भंडारे


Scanned by CamScanner

१० अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा
डॉ. योगिनी सातारकर

११ अण्णा भाऊ साठे : विद्रोही विचारधारेचे वारसदार
डॉ. राजेश्वर दुडूकनाळे

१२ अण्णा भाऊ साठे यांचे कथा वाङ्मय
डॉ. माधव बसवंते

१३ अण्णा भाऊ साठे : संघर्षशील व्यक्तीमत्त्व
प्रा. भाग्यश्री आर. पाटील

१४ कॉ. अण्णा भाऊ साठे यांचे परिवर्तनाला योगदान
डॉ. अनंता सूर

१५ प्रतिभावंत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे
डॉ. गणेश चंदनशिवे

१६ उपेक्षितांचा बुलंद आवाज : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे
डॉ. सतीश मस्के

१७ अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्री प्रतिमा : स्त्रीवादी दृष्टिकोन
प्रा. स्वाती हरिभाऊ काटे

१८ अण्णा भाऊ साठे आणि साहित्य : एक शोध
शैलेश पांडुरंग कांबळे

परिशिष्ट १ भाषण : दलित साहित्य संमेलन : १९५८
परिशिष्ट २ महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया
परिशिष्ट ३ कथा : बरबाद्या कंजारी
परिशिष्ट ४ अण्णा भाऊ साठे यांची वाङ्मयसूची

• विद्यापीठ गीत

Scanned by CamScanner

# ११

# अण्णा भाऊ साठे : विद्रोही विचारधारेचे वारसदार

■

डॉ. राजेश्वर दुडूकनाळे

अण्णा भाऊ साठे हे मराठी साहित्यातील एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व! कामगार, शाहीर, कथाकार, कादंबरीकार, नाटककार, चळवळीतील कार्यकर्ता, संघटक, पत्रकार, अभिनेता आणि माणसावर नितांत प्रेम करणारा कलावंत असे विविध पैलू या व्यक्तिमत्त्वाला आहेत. अशा बहुआयामी कलावंताच्या निवडक साहित्याचा विद्रोही जाणिवांच्या अंगाने याठिकाणी वेध घ्यावयाचा आहे. हा वेध घेत असताना प्रामुख्याने 'इनामदार' हे तीन अंकी नाटक, 'दलित साहित्य संमेलनातील भाषण' व 'युगांतर' मधील लेखन विचारात घेतले आहे.

**इनामदार**

वर्गवादी व वर्णवादी जाणिवा घेऊन येणारे हे अण्णा भाऊंचे तीन अंकी नाटक होय. प्रस्तुत नाटकामध्ये मुनीमजी, करीम, रामू, गोपाळराव देशमुख, गोविंदराव भिडे, नरशा, गुणा, सर्जेराव, मुकिंदा, म्हादू, काशी, पांडू, फौजदार अशी प्रमुख पात्रं आहेत. गोपाळराव देशमुख हा येळापुरातील इनामदार असतो. तीन पिढ्यांपासून त्याचे गावातील लोकांशी वैर असते. त्यामुळे तो संकटकाळी गोविंदराव भिडे या पंचाग पाहून भविष्य सांगणाऱ्या ब्राह्मणाचे मार्गदर्शन घेतो. अलीकडे वर्गजागृत राणू, दिनू आणि महिपती संघटितपणे देशमुखच्या विरोधात बंड पुकारतात. त्यामळे देशमुखाकडून होणारे शोषण आणि त्याचा दरारा कमी होऊ लागतो. अशातच नरशा नावाच्या बंडकऱ्याची खंडणीसाठी चिठ्ठी येते. ही चिठ्ठी घेऊन येणारा रामू उशिरा येतो. त्यामुळे तीन दिवसांची मुदत संपते. मुदत संपल्यामुळे नरशाच देशमुखाच्या वाड्यात हजर होतो. पाटील त्याला मुकिंदाच्या खुनाची सुपारी देतो. त्यानुसार नरशा मुकिंदाचा खून करून

फरार होतो. फौजदार गावात येऊन मुकिंदाच्या खुन्याचा शोध घेऊ लागतो. तो गावातल्या परिस्थितीवर लक्ष ठेवून असतो. इकडे परिस्थिती बिघडत असल्यामुळे आणि मुकिंदाच्या खुनाचे खरे सूत्रधार आपणच आहोत, हे माहीत होईल म्हणून गोपाळराव देशमुख गाव सोडण्याच्या तयारीत असतो. परंतु गावकरी नरशाला वेढा देऊन त्याच्यावर हल्ला करतात. त्याचा पाय मोडतात. त्यामळे चिडून जाऊन तो देशमुखाकडे येतो आणि दोन हजाराची सुपारी देऊन देशमुखानेच मुकिंदाचा खून करायला लावल्याचे सांगतो. रागाच्या भरात तो देशमुखाच्या अंगावर गोळ्या झाडतो आणि फौजदार नरशाला गोळ्या घालतो. तेवढ्यात गावकरी धावत येतात. देशमुख आणि नरशा मरून पडलेले असतात हे पाहून गोविंदरावची दातखिळी बसते. येथेच नाटक संपते.

'इनामदार' या नाटकातून विनोदी, वर्गवादी, वर्णवादी, विद्रोही जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. या नाटकातील गोपाळराव देशमुख आणि गोविंदराव भिडे हे प्रस्थापित वर्गाचे म्हणजेच शोषक वर्गाचे प्रतिनिधी आहेत. गावपातळीवर वतनदार आणि धर्माचे ठेकेदार यांची कशी युती आहे, हे देशमुख-भिडे यांच्या संबंधातून लक्षात येते. देशमुखाची पत्नी अपत्य प्राप्तीसाठी काशीला गेलेली असते. पैसे पाठवा म्हणून पत्नीचा निरोप आल्यानंतर लगेच देशमुख मुनीमाला हवे तेवढे पैसे पाठविण्याचा आदेश देतो. इकडे मात्र गावातील लोकांचे कर्जवसुलीच्या निमित्ताने शोषण करतो. गावातील लोक वसुली देत नाहीत म्हणून चिडलेला देशमुख म्हणतो, ''या हरामखोर कुळांची यादी करा नि त्यांच्यावर खटले भरण्याची तरतूद करा. मला माहीत आहे. या सर्व कुळांना त्या मुकिंदाने, महिपतीने, राणूजीने या माझ्या वैऱ्यांनी भडकावले आहे! म्हणून ही मढी जीव आल्याप्रमाणे करीत आहेत.''[१] येळापुरात नानासाहेब, गणपतराव ते गोपाळराव अशा तीन पिढ्यांपासून सामान्य माणसांचे आर्थिक शोषण चालू आहे. सामान्य माणसांचे शोषण करायचे आणि देवाच्या, दैवाच्या नावावर भिडेसारख्या कर्मठ माणसावर पैसे खर्च करायचे, असा या वतनदारांचा शिरस्ता आहे. या शोषणाच्या विरोधात गावकरी विद्रोह करू लागतात तेव्हा देशमुख भडकतो. देशमुखाचा मार्गदर्शक असलेला भिडे तर गावात जातीजातीत भांडण कसे निर्माण होईल याच प्रयत्नात असतो. हा गोंविदराव भिडे म्हणजे कर्मठ, प्रतिगामी उच्चवर्णीयांचा प्रतिनिधी आहे. गोपाळराव संकटात आहे हे लक्षात आल्यानंतर तो पंचांगाचा आधार घेऊन आपण किती ज्ञानी आहोत, हे दाखवीत असतो. देशमुखाला पडलेल्या वाईट स्वप्नावर उपाय सुचवताना भिडे म्हणतो, ''आता प्रथम स्वप्नशांतीचं एक जेवण घाला; फक्त ब्राह्मणांना. दुसरी गोष्ट, माईसाहेबांना परत बोलावून घ्या!''[२] असे सल्ले देऊन भिडे आपल्या जातीय अहंकाराचे, श्रेष्ठत्वाचे दर्शन घडवितो. देशमुख आणि भिडे इथेच थांबत नाहीत तर मल्ल्याला हाताशी धरून गुणाच्या चारित्र्यावर घाला



Scanned by CamScanner

घालण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सर्जेराव आणि मुकिंदा यांच्यात संघर्ष निर्माण होतो. मुकिंदा हा विचारी आणि तितकाच बंडखोर माणूस आहे. तो जातीपातीच्या पुढे जाऊन माणुसकीचे नाते जपण्याचा सल्ला सर्जेरावाला देतो. थोडक्यात, 'इनामदार' या नाटकातून अण्णा भाऊंनी आर्थिक, सामाजिक शोषणावर प्रकाश टाकला आहे. दिनकर, राणूजी आणि महिपती ही पडद्यामागची पात्रं असली तरी ती गावकऱ्यांचे शोषण थांबविण्यासाठी देशमुखाच्या विरोधात विद्रोह पत्करतात. त्यातच नरशाचा आणि देशमुखाचा अंत होतो.

## दलित साहित्य संमेलनातील भाषण

०२ मार्च १९५८ रोजी महाराष्ट्र दलित साहित्य संघाच्या वतीने पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे उद्‌घाटक म्हणून अण्णा भाऊंनी कलेले भाषण अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण आहे. या साहित्य संमेलनासाठी नियोजित उद्‌घाटक आचार्य अत्रे काही कारणाने येऊ न शकल्याने अण्णा भाऊंना उद्‌घाटक म्हणून निमंत्रित करण्यात आले. आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासामध्ये दलित साहित्याला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करून देण्यात अण्णा भाऊंच्या लेखणीचे मोलाचे योगदान आहे. शोषित माणसांबद्दल अण्णा भाऊंच्या मनात सहानुभूती असल्यामुळे दलित साहित्य हा त्यांच्या आस्थेचा विषय आहे. त्या काळामध्ये प्रस्थापित पांढरपेशा वर्गाचे साहित्य शोषितांच्या साहित्याची, प्रश्नांची उपेक्षा करीत होते. हे पांढरपेशे समीक्षक एवढ्यावरच न थांबता 'वेगळ्या अशा दलित साहित्य संमेलनाची आवश्यकताच काय?' असा प्रश्न उपस्थित करीत होते. त्यांच्या या प्रश्नाला अण्णा भाऊंनी प्रस्तुत भाषणातून अत्यंत समर्पक उत्तर दिले आहे. या देशामध्ये दलितांचे म्हणून काही प्रश्न आहेत. त्या प्रश्नांचे प्रतिबिंब मराठी साहित्यात दिसत नाही. प्रस्थापित व्यवस्थेतील लेखक दलितांच्या प्रश्नांकडे, त्यांच्या जीवनसंघर्षाकडे दुर्लक्ष करतात. अशा या दलितांच्या उपेक्षेला, शोषणाला वाचा फोडण्यासाठी, त्यांच्या संघर्षाला आणि विद्रोहाला साहित्याचा विषय बनविण्यासाठी आणि महत्त्वाचे म्हणजे दलितांच्या सामाजिक न्यायासाठी अण्णा भाऊंना दलित साहित्याची आणि साहित्य संमेलनाची नितान्त आवश्यकता वाटते.

दलितांच्या संघर्षावर समाजाचा हा डोलारा उभा आहे, असे लेखकाला वाटते. अशा दलितांबद्दल लिहितांना काळजीपूर्वक लिहावे असा सल्लाही या भाषणातून ते लेखकांना देतात. ते लिहितात, ''जपून लिहावे, कारण या समाजाची घडीन घडी त्या दलिताने व्यापवली आहे.'' अधिक काव्यमय शब्दात बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की, ''हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलिताच्या तळहातावर तरलेली आहे.'' अशा या दलितांचे जीवन खडकातून झिरपणाऱ्या पाझराप्रमाणे असते. ते जवळ जाऊन पाहा. मग लिहा. कारण जावे ज्याच्या वंशा तेव्हा कळे हे तुकारामांचे



Scanned by CamScanner

म्हणणे खोटे नाही.''[३] यावरून अण्णा भाऊ दलितांच्या जगण्याकडे किती वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहतात, हे लक्षात येते. त्याचबरोबर लेखकाची जबाबदारीही समजते. या त्यांच्या विवेचनातील 'हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलिताच्या तळहातावर तरलेली आहे.' हे वाक्य तर प्रस्थापितांच्या मिथकाला जबरदस्त धक्का देणारे आहे. वैदिक धर्मव्यवस्थेने अनेक पुराणकथा रचून बहुजनांचे शोषण केले आहे. शेषाच्या मस्तकावर पृथ्वीचा भार असल्याचे सांगून याच व्यवस्थेने दलितांचे मोठे शोषण केले. त्यामुळे अण्णा भाऊ आपल्या या विधानातून एक सामाजिक वास्तव माडतात. अर्थातच त्यांच्या या विधानातून विद्रोही, पुरोगामी, परिवर्तनवादी, वैचारिक भूमिका व्यक्त होते.

अण्णा भाऊ साहित्याचे ध्येय काय असावे हे सांगताना लिहितात, ''तू गुलाम नाहीस, हे जग तुझ्या हातावर आहे, याची जाणीव करून घ्यावी. त्याचे जीवन वरच्या पातळीवर नेण्याची शिकस्त करावी आणि त्यासाठी लेखक हा सदैव आपल्या जनतेबरोबर असावा लागतो.''[४] अण्णा भाऊंचे हे विवेचन डॉ. आंबेडकरांच्या ''गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल.'' या विधानाची आठवण करून देणारे आहे. साहित्याने वाचकाच्या मनात विद्रोही जाणिवांची पेरणी करावी, त्याशिवाय सामाजिक परिवर्तन अशक्य आहे, हा अण्णा भाऊंच्या या म्हणण्याचा अन्वयार्थ होय. भाषणाच्या शेवटी तथाकथित विद्वानांचा समाचार अण्णा भाऊंनी घेतला आहे. हा समाचार घेताना ते लिहितात, काही विद्वान म्हणतात, ''अस्पृश्यता कायद्याने नष्ट केली आहे तेव्हा दलित हा प्राणी अस्तित्वात नाही. परंतु हा केवळ भ्रम आहे एका गावात एका सार्वजनिक आडावर पाणी भरताना उच्चवर्णीय हिंदूंची काळजे धडधडतात. महारा मांगाचा पोवरा जोपर्यंत पाण्यात आहे तोपर्यंत आपला पोवरा पाण्यात सोडत नाहीत. कित्येक हॉटेलात 'खास' कप ठेवलेले आढळतात. याचे कारण युगायुगाचे समज एका क्षणात नष्ट होत नसतात. म्हणून आम्ही दलित साहित्य निर्माण केले पाहिजे.''[५] अशा प्रकारे अण्णा भाऊंनी सामाजिक विषमतेवर हल्ला चढवला आहे. अस्पृश्यता कायद्याने नष्ट होणार नाही तर त्यासाठी प्रबोधनाची आवश्यकता आहे. असे समाजप्रबोधन दलित साहित्यातून झाले पाहिजे, असे लेखकाला वाटते. एकूणच, भारतीय समाजातील अस्पृश्यता, विषमता, जातीयता संपवायची असेल तर दलित साहित्याने आणि लेखकाने विद्रोही भूमिका घेऊन दलितांचे प्रश्न साहित्याच्या क्षेत्रात मांडले पाहिजेत, असा या भाषणाचा अन्वयार्थ आहे. प्रस्तुत भाषणाचा शेवट गॉर्कीच्या क्रांतिकारी विचाराने केला आहे. म्हणून पुरोगामी, परिवर्तनवादी आणि विद्रोही दृष्टिकोनातून अण्णा भाऊंचे हे भाषण महत्त्वपूर्ण मानावे लागते. १९५८ सालचे हे अण्णा भाऊंचे भाषण डॉ. आंबेडकरांच्या वैचारिक भूमिकेशी बांधिलकी सांगणारे आहे.



Scanned by CamScanner

## 'युगांतर'मधील लेखन

अण्णा भाऊ साठे यांनी १९५१ ते १९६५ या काळात 'युगांतर' या साम्यवादी पक्षाच्या मुखपत्रातून लेखन केले आहे. 'लोकयुद्ध', 'लोकसाहित्य', 'युगांतर' ही साप्ताहिके मार्क्सवादी विचारधारेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी अस्तित्वात आली होती. अण्णा भाऊंच्या जीवनकार्याची प्रेरणा मार्क्सवाद असल्यामुळे ते या साप्ताहिकातून लिहू लागले. 'युगांतर' मधून 'हवं ते लिहितो' या लेखमालेअंतर्गत त्यांनी अनेक लेख लिहिले आहेत. त्याचबरोबर कथा, कविता, व्यक्तिचित्रणे, अनुभवकथन, वृत्तांतलेखन आणि प्रवासवर्णनपर लेखनही केले आहे. त्यातल्या काही कथा आणि प्रवासवर्णनपर केलेले लेखन पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाले आहे. युगांतर मधील अप्रसिद्ध साहित्य कोल्हापूरच्या श्रमिक प्रतिष्ठानने पुस्तक रूपाने वाचकांसमोर आणले आहे. 'मी का लिहितो' या सदरांतर्गत अण्णा भाऊंनी 'हवं ते लिहितो', 'मी कथा कशा लिहितो', 'अण्णा भाऊंची कैफियत', 'संयुक्त महाराष्ट्राचा लढा व जातवास्तव', 'केरळमधील नसती उठाठेव', 'कोसळलेला कडा' इ. लेख लिहिले आहेत. कथा कादंबरी लेखनामागील त्यांची भूमिका या लेखनातून वाचकांच्या लक्षात येते. मानवी जीवनाकडे आणि साहित्याकडे ते लेखक म्हणून कसे पाहतात, हेही लक्षात येते.

'युगांतर'मधून प्रसिद्ध झालेला 'संयुक्त महाराष्ट्राचा लढा व जातवास्तव' हा लेख अण्णा भाऊंच्या बंडखोर व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणारा आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये त्यांनी सक्रिय भाग घेतला होता. ही चळवळ सुरू होण्यापूर्वी म्हणजेच ८ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या असंख्य अनुयायांसह नागपूर येथे बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. त्यामुळे ग्रामीण भागात दलितांना छळले जाऊ लागले. बौद्ध धर्माच्या स्वीकारामुळे दलितांच्या जीवनात होऊ घातलेले परिवर्तन प्रस्थापितांना खटकू लागले. हेच बौद्ध धर्माचा स्वीकार केलेले दलित या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये अग्रेसर होते. अशा दलितांना गावातील धर्मांध जात्यांध लोक त्रास देऊ लागले याचे वर्णन करताना अण्णा भाऊ लिहितात, ''काही ठिकाणी महारांच्या घरांवर हल्ले चढवण्यात आले आहेत. काही ठिकाणी महारांना हाताशी धरून इतरांवर हात टाकण्यात आला आहे. बायका-पोरांना धमक्या देणं, त्यांना शेतात येण्याची बंदी करणं, आपल्या शेतीतून जाणाऱ्या महारांच्या पाणवठ्याच्या वाटा कुडणं, अडवणं हे प्रकार पुष्कळ ठिकाणी घडत आहेत. परंतु तरीही हा नवबुद्ध यत्किंचित मागं सरलेला नाही, त्यानं आपली जागा सोडलेली नाही. डॉ. बाबासाहेबांच्या आज्ञेचं तो प्राणपणाने पालन करीत आहे.''[६] अशा छळामुळे नवबौद्ध डगमगणार नाहीत, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील एकात्मता भंगणार नाही, असे अण्णा भाऊंना वाटते.



Scanned by CamScanner

धर्मांधता, जातीयता ही भारतीय समाजव्यवस्थेतील एक गंभीर समस्या आहे. वैदिक धर्माच्या विषमतावादी तत्त्वज्ञानामुळे हजारो वर्षांपासून ही धर्मांधता, जातीयता समाजात रुजलेली आहे. तिची पाळंमुळं घट्ट झालेली आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात अस्पृश्य जातीच्या वाट्याला अत्यंत वेदनादायी असे जगणे आले. याच लेखामध्ये अण्णा भाऊंनी एका खेड्यातील पाटलाच्या घरी मेलेल्या गायीमुळे निर्माण झालेला प्रसंग सांगितला आहे. पाटील गावातील महारांना मेलेली गाय ओढून टाकण्याचा आदेश देतो. परंतु डॉ. आंबेडकरांच्या धम्मक्रांतीमुळे स्वाभिमानी बनलेले महार मेलेली गाय ओढण्यास नकार देतात. त्यामुळे पाटील आणि महार यांच्यात संघर्ष निर्माण होतो. शेवटी हे लोक आपले ऐकत नाहीत म्हणून चिडलेला पाटील अस्पृश्यांच्या आडात मेलेली गाय टाकतो. अशा महाराष्ट्रातल्या दुष्ट माणसाच्या प्रवृत्तीबद्दल लेखकाच्या मनात प्रचंड चीड आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये सक्रिय असलेल्या नवबौद्धांना गावातील सधन लोकांकडून जो त्रास झाला त्याबद्दलही अण्णा भाऊ कठोर भाषेत प्रतिक्रिया व्यक्त करतात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये कम्युनिस्ट लोक असल्यामुळे उद्या महाराष्ट्रात यांची सत्ता येईल म्हणून सक्रिय असलेल्या दलित कार्यकर्त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न कितीही केला तरी याच बंडखोर व विद्रोही दलितांच्या संघर्षातून उद्याचा नवा महाराष्ट्र अस्तित्वात येईल, असे अण्णा भाऊंना वाटते. थोडक्यात, अण्णा भाऊंचा प्रस्तुत लेख म्हणजे भारतीय समाजव्यवस्थेतील सामाजिक विषमतेचे धगधगते चित्रण होय. शोषण, अस्पृश्यता, जातीयता, धर्मांधता किती अमानवी पातळी गाठू शकते, हे या लेखातून अण्णा भाऊंनी दाखवून दिले आहे.

केरळमधील 'नसती उठाठेव' या लेखामध्ये केरळमधील काँग्रेस पक्ष आणि सत्तेवर आलेल्या कॉ. नंबुद्रीपाद यांच्यात कसा संघर्ष निर्माण झाला याचे विवेचन आले आहे. 'कोसळलेला कडा' मध्ये मुंबईतील चिरागनगर येथे चारशे फूट उंचीचा प्रचंड मोठा कडा कोसळून झालेल्या अपघाताचे वर्णन आले आहे. सांताक्रूझ विमानतळावरील विमानांना त्रास होतो म्हणून हा कडा पाडण्यात आला. त्यात अनेक शेतमजुरांचे, कामगारांचे प्राण गेले. भांडवली व्यवस्थेमध्ये कामगारांचे कसे प्राण जातात हे यावरून लक्षात येते.

अण्णा भाऊ हे बहुश्रुत कलावंत होते. त्यामुळे त्यांनी काही ग्रंथपरीक्षणे लिहिली आहेत. त्याचबरोबर काही आस्वादपर लेखही लिहिले आहेत. रशियन कादंबरीकार प्योदर दोस्तोव्हस्की याच्या 'क्राईम अँड पनिशमेंट' या स. अ. शुक्ल अनुवादित 'देव जागा आहे' या कादंबरीचे परीक्षण केले. त्यानंतर भानूशीर धनकर यांच्या 'कारवारचा काळोराम' या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. नामदेव व्हटकर यांनी 'मराठीची लोककला : तमाशा' या नावाचे पुस्तक लिहिले. त्याचेही परीक्षण अण्णा



Scanned by CamScanner

भाऊंनी केले आहे. त्याचबरोबर के. ए. अब्बास यांच्या 'चार दिल चार राहे' या चित्रपटावर आस्वादपर लेखही लिहिला आहे.

'अमरावतीचा दौरा', 'सलीमा', 'टिप्पिरा', 'चावरा ढेकणा' असे अनुभव कथनात्मक व व्यक्तिचित्रणात्मक लेखनही त्यांनी केले आहे.

'युगांतर'मधून अण्णा भाऊंच्या काही कथाही प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यात 'विठू महार', 'सापळा', 'बुद्धाची शपथ', 'सोन्याचा मणी', 'उपकाराची फेड', 'रागा आणि गोदा', 'दूर्गा', 'रामाची सीता', 'आग', 'माहेरची वाट', 'खिंडीतील गाव' अशा कथांचा समावेश होतो. यातील 'सापळा', 'बुद्धाची शपथ' आणि 'उपकराची फेड' या अण्णा भाऊंच्या कथा आंबेडकरवादाची प्रेरणा घेऊन येणाऱ्या आहेत. कथांबरोबरच 'बुलंद बळ मर्दाचे', 'सत्तारूढ केरळात', 'दौड', 'हे आम्हांवर लादले', 'रणपंडित शिवराय होऊनी गेले' या कविता त्यांनी 'युगांतर'मधून लिहिल्या आहेत. त्यांच्या या कवितांमधून मराठी माणसाचा लढाऊ बाणा व्यक्त होतो. एकूणच, 'युगांतर' मधून प्रसिद्ध झालेल्या साहित्यातून अण्णा भाऊंच्या लेखनामागील प्रेरणा मार्क्सवादी, आंबेडकरवादी कशी आहे हे लक्षात येते. ह्या प्रेरणा घेऊन त्यांनी आर्थिक आणि सामाजिक विषमतेवर प्रहार करणारे लेखनही याच साप्ताहिकातून केल्याचे लक्षात येते. महाराष्ट्र, मराठी माणूस याबद्दलचा स्वाभिमानही या लेखनातून व्यक्त झालेला दिसतो. कम्युनिस्ट पक्षाच्या अस्तित्वासाठी त्यांनी मार्क्सवादी विचारधारेचा कसा प्रसार होईल यासाठी प्रयत्नही केलेले दिसतात. प्रामुख्याने 'संयुक्त महाराष्ट्राचा लढा व जात वास्तव' या लेखातून आणि 'विठू महार', 'सापळा', 'बुद्धाची शपथ', सोन्याचा मणी', उपकाराची फेड' या कथांमधून सामाजिक गुलामगिरीच्या विरोधात पुकारलेला विद्रोह लक्षणीय आहे.

अण्णा भाऊ साठे यांच्या कथा, कादंबरी, शाहिरी कविता, लोकनाट्य, नाटक आणि स्फुट लेखनातून विद्रोही जाणिवांचा उत्कट आविष्कार झाला आहे. वर्ग-जाती संघर्षाचे संमिश्र चित्रण त्यांच्या साहित्यात येते. म्हणून वर्गसमाज आणि जातिसमाज हे त्यांच्या विद्रोहाचे लक्ष्य आहे. अन्यायाविरुद्धची झुंज, संघर्ष, विद्रोह हा त्यांच्या लेखनविषयाचा एक स्थायी भाव आहे. शोषक आणि शोषित यांच्यातील संघर्ष हा त्यांच्या साहित्याचा मुख्य विषय आहे. त्यांच्या सर्व प्रकारच्या लेखनातून शोषणाचा धिक्कार, प्रतिकार आणि स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुभावाचा पुरस्कार प्रत्ययास येतो. सामाजिक आणि आर्थिक विषमतेने शोषित माणसाचे 'माणूस' म्हणून असणारे अस्तित्वच नाकारले. अशा शोषितांना माणूसपण प्राप्त करून देण्यासाठीच अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य विद्रोही जीवनमूल्यांची पेरणी करते. उपेक्षित शोषितांच्या अंतरंगातील विद्रोह आधुनिक मराठीतील ललित साहित्यात प्रथमच अण्णा भाऊंच्या साहित्यातून अनुभवाचा व्यापक पट घेऊन अभिव्यक्त झाला.



Scanned by CamScanner

अण्णा भाऊपूर्व मराठी साहित्याचा केंद्रबिंदू मध्यमवर्ग होता. अण्णा भाऊंनी मात्र मस्तकात विद्रोह घेऊन जगणाऱ्या उपेक्षित, शोषित वर्गाला मराठी साहित्याचा केंद्रबिंदू बनविले. हा त्यांचा विद्रोही प्रवास आधुनिक मराठी ललित साहित्यात अपूर्वच म्हणायला हवा. एकूणच, अण्णा भाऊ साठे यांचे सबंध साहित्यच विद्रोहाचे जीवनगाणे आहे. या त्यांच्या साहित्याच्या मस्तकात विद्रोहाचा अग्नी आहे, तर हृदयात समतेचे, न्यायाचे मंगलमय मधुर संगीत आहे.

अण्णा भाऊ साठे यांचे सबंध साहित्यच विद्रोही तत्त्वज्ञानावर उभे आहे. हे विद्रोही तत्त्वज्ञान त्यांना मार्क्स, गॉर्की, फुले, आंबेडकर यांच्याकडून मिळालेले आहे. या विद्रोही तत्त्वज्ञानातून प्रेरणा घेऊन अण्णा भाऊंनी मराठी साहित्याच्या भूमीत समाजपरिवर्तनाचा विचार पेरला. क्रांतीचा मळा फुलवला, सजवला. म्हणून आधुनिक मराठीतील महात्मा फुल्यांपासून चालत आलेल्या विद्रोही ललित साहित्याच्या प्रवाहाला अधिक सशक्त आणि व्यापक बनविणारे साहित्यिक म्हणून अण्णा भाऊ साठे महत्त्वाचे ठरतात.

शोषणाला नकार देणारी आणि समतेचा पुरस्कार करणारी विद्रोही सांस्कृतिक परंपरा बळीराजा, चार्वाक, महावीर, बुद्ध, कबीर, तुकाराम, मार्क्स, फुले, शाहू, आंबेडकर यांनी समृद्ध केली आहे. सर्व प्रकारच्या शोषणावर 'घाव' घालणारे अण्णा भाऊ साठे याच विद्रोही सांस्कृतिक विचारधारेचे वारसदार ठरतात.

**संदर्भ**

१) डांगळे अर्जुन व इतर (सं.) : 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय', म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. प. आ. १९९८, पृ. ७४.
२) तत्रैव. पृ. ७९.
३) तत्रैव. पृ. ११७६.
४) तत्रैव. पृ. ११७६-११७७.
५) तत्रैव. पृ. ११७८.
६) चौसाळकर अशोक, शिंदे रणधीर (सं.) : 'युगांतर'मधील 'अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य'. श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर प्रथम आवृत्ती २०११, पृ. ४४.

■ ■ ■



Scanned by CamScanner